# तिरुपती अर्बन को-ऑप. बँक लि.

मुख्य कार्यालय : १७२, श्रध्दानंदपेठ, दक्षिण अंबाझरी मार्ग, नागपूर-१०
0712-2231772,0712-2235600 email – info@tirupatibank.com


जा.क्र. TUCB-H.O./Minimum Share & K.Y.C. 2023-24/81
RPAD/Courier

दिनांक: १९/०७/२०२३

## स्मरणपत्र

प्रती,
श्री/श्रीमती
पूर्ण पत्ता :

भागधारक क्र.:

विषय: १) सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे हयांच्या कार्यालियाद्वारे मंजूर केलेल्या तसेच रिजर्व बँक ऑफ इंडिया कडून प्राप्त ना हरकत प्रमाण पत्राच्या आधारे बँकेच्या सुधारित उपविधी क्रमांक २३(i) आणि २४ (i), २४(j) अनुसार K.Y.C. चे अनुपालन करण्यासंबंधी

२) सुधारित उपविधी क्रमांक 11 i)b), 11-A आणि 24(h), 24(i) अनुसार किमान शेयर खरेदी करण्याबाबत.

महोदय/महोदया,

आपण तिरूपती अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक लि, चे विद्यमान भागधारक असून, आपली बँक स्थापनेपासूनच आपल्या मोलाच्या सहकार्यामुळे निरंतर लाभांश वितरित करणारी बँक आहे हे आपल्याला विदित आहे.

आपल्याला सूचित करण्यात येते कि, आपण अजून पावेतो के.वाय.सी. दस्तऐवज सादर केलेल नाहीत, हयाबाबत सर्वसाधारण सभेच्या आपणास पाठविलेल्या नोटीस मध्ये विनंती केली होती. तेसच आपल्याला वर्तमान पत्राद्वारे बँकेच्या वेबसाईट वर देखील के.वाय.सी. सादर करण्याबाबत वारंवार सूचना करून देखील आपण के.वाय.सी. दस्ताऐवज सादर केलेले नाहीत. आपल्याला के. वाय.सी. दस्तऐवज सादर करणे अनिवार्य आहे हयाची कृपया आपण दखल घ्यावी.

सबब आपल्याला हया पत्राद्वारे के.वाय.सी. दस्तऐवज सादर करण्याची पुनः विनंती करण्यात येत आहे. सदर अनुपालन हे पत्र मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत करण्यात यावे अन्यथा बँकेच्या सुधारित उपविधीतील उपरोक्त प्रवधानांनुसार आपले सदस्यत्व रद्द करण्यासहित आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

के.वाय.सी. पूर्तता करण्यासाठी खालील कागदपत्रे बँकेत सादर करणे आवश्यक आहे: आधार कार्ड, पॅन कार्ड अथवा ड्रायविंग लायसन्स सोबत इलेक्ट्रिसिटी किंवा टेलेफोन बिल व पासपोर्ट साईझ फोटो.

त्याचप्रमाणे, मार्च २०२३ मध्ये संपन्न झालेल्या बँकेच्या विशेष सर्वसाधारण सभेने पारित केलेल्या सुधारित उपविधीनुसार आपल्याला शेयरची किमान रक्कम रू. २५००/— च्या मर्यादिपर्यंत वाढविणे अनिवार्य आहे. सद्यस्थितित आपले समभाग मूल्य (शेयरची रक्कम) रू.       /— एवढी असून सुधारित उपविधी क्र. 11 i) b) आणि 11-A अनुसार शेयरच्या रकमेतील फरक रू.       /— भरणे आवश्यक आहे. सबब हि सूचना मिळाल्याच्या १५ दिवसांच्या आत आपण आपली शेयरची रक्कम रू. २,५००/— मर्यादिपर्यंत वाढवावी हि आग्रहाची विनंती. रू. २५००/— किमान मर्यादिपर्यंत शेयरची रक्कम विहित मुदतीत न वाढविल्यास सुधारित उपविधी क्र. 24(h), 24(i), अंतर्गत प्रावधानानुसार आपले सदस्यत्व रद्द करून आपल्या विद्यमान शेयरच्या रक्कमेचा पे ऑर्डर (Pay Order) आपल्या उपलब्ध पत्त्यावर पाठविण्या सहित आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. हया बाबत आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे,

अधिक माहितीसाठी खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

मो.नं. १) ९७६६११०३११
       २) ९१५८८८८०६२
ठिकाण: नागपूर

प्राधिकृत अधिकारी